Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र: परीक्षा/समन्वय/२०२५/1124 दि. १५.१२.२०२५

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

**विषय:** सर्व शाखांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी अध्यापकांना मूल्यमापन केंद्रावर पाठविणेबाबत.

मा.महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, नोव्हेंबर/डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे काम विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ येथे व विद्यापीठाने निश्चित केलेल्या महाविद्यालयातील मूल्यमापन केंद्रावर सुरु आहे. मूल्यमापन केंद्राच्या संचालकांनी मूल्यमापन केंद्रावर अध्यापक कमी प्रमाणात रुजू झाले असल्याचे कळविले आहे.

त्यानुषंगाने सदर पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ चे कलम ८८ नुसार विहित कालमर्यादेत निकाल जाहीर करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांना आदेश प्राप्त होताच मूल्यमापनासाठी मूल्यमापन केंद्रांवर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करवून कार्यमुक्तीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ कलम ४८(४) नुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सदर काम करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी व सर्व संबंधीतांना आपले स्तरावरुन सूचीत करावे. मूल्यमापनाच्या कामात सहकार्य करत नसल्याचे निदर्शनास आल्यास ही बाब गंभीर समजण्यात येवून वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल व अशा शिक्षकावर सदर नियमातील तरतुदीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे ही त्यांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे व मूल्यमापनाचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे, ही विनंती.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

याची प्रत: संचालक, सर्व शाखांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे मूल्यमापन केंद्र, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देवून कळविण्यात येते की, जे अध्यापक आपल्या मूल्यांकन केंद्रावर रुजू झाले नाहीत त्यांना सदर पत्राच्या अनुषंगाने पत्र देवून रुज होणेबाबत कळवावे व त्यानंतर ही रुजू न झाल्यास त्यांची नावे या कार्यालयास कळवावे.